# प्रेस नोट

दिनांक १७/१२/२०२५

लोकसेवक अमोल गणेशराव फड, वय ३९ वर्षे, पद वनपाल, सामाजिक वनिकरण सेलु, अतिरिक्त कार्यभार वनपरिक्षेत्र अधिकारी, सामाजिक वनिकरण, सेलू, जि. परभणी, ह.मु. दत्तमंदिर परिसर, चौधरी पेट्रोल पंपाचे बाजुस, गंगाखेड यांनी पडताळणी कार्यवाही दरम्यान १०,०००/- रूपयांची मागणी करून सापळा कार्यवाही दरम्यान ५,०००/- रूपये स्विकारले प्रकरणी असीबीच्या जाळयात.

| | |
|---|---|
| युनिट | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी |
| पो.स्टे.गुरनं व कलम | पो.स्टे. पाथरी, गुरनं ७०९/२०२५ कलम ७ भ्रष्टाचार.प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक | दिनांक १७/१२/२०२५ |
| आरोपी यांचे नाव, हुद्दा व पत्ता | अमोल गणेशराव फड, वय ३९ वर्षे, पद वनपाल, सामाजिक वनिकरण सेलु, अतिरिक्त कार्यभार वनपरिक्षेत्र अधिकारी, सामाजिक वनिकरण सेलु, जि. परभणी., ह.मु. दत्तमंदिर परिसर, चौधरी पेट्रोल पंपाचे बाजुस, गंगाखेड, रा.वाघदरा ता.गंगाखेड जि.परभणी |
| लाच स्विकारली रक्कम | ५,०००/- रूपये. |

**थोडक्यात माहिती :-**

दिनांक १६/१२/२०२५ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, त्यांचे मौजे मानोली, ता. मानवत, जि.परभणी येथील शेतजमीनीत बांबु लागवड केलेली आहे. त्यासंबंधाने तक्रारदार यांनी दि. १३/१२/२०२५ रोजी सामाजीक वनिकरण कार्यालय सेलू येथे वनपाल फड यांची भेट घेतली असता, वनपाल फड यांनी तक्रारदार यांचे शेतातील बांबू लागवडीचे कुशल कामाचे १,७३,२८०/- रूपयांचे बिलावर सही करून वरिष्ठ कार्यालयात पाठवण्यासाठी बिलाच्या १५ टक्के प्रमाणे पैशाची मागणी केली. त्यावरून तक्रारदार यांनी पैसे कमी करण्याची विंनती केली असता वनपाल फड यांनी १०,०००/- रूपयांची मागणी करून २,०००/- रू. तक्रारदार यांच्याकडून घेतले आहेत. उर्वरित रक्कम २ ते ३ दिवसांनी घेवून येण्यास सांगितले होते. सदरची रक्कम लाच आहे. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १६/१२/२०२५ रोजी ला.प्र.वि. परभणी येथे तक्रार अर्ज दिला आहे.

त्यावरून दि. १६/१२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान वनपाल फड यांनी तक्रारदार यांच्याकडे मागणी केलेल्या १०,०००/- रूपयांपैकी २,०००/- रूपये यापूर्वी स्विकारल्याचे मान्य करून राहिलेल्या ८,०००/- रूपया पैकी ५,०००/- रू. आताच आणून दया, असे म्हणून वनपाल फड यांनी तक्रारदार यांच्याकडे ५,०००/- रू. लाच मागणी पंचासमक्ष केल्याचे निष्पन्न झाले.

दि. १६/१२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक अमोल फड, वनपाल सामाजिक वनिकरण सेलू, अतिरिक्त कार्यभार वनपरिक्षेत्रीय अधिकारी, सामाजिक वनिकरण सेलू यांनी तक्रारदार यांच्याकडून लाचमागणी केलेली ५,०००/- रू. रक्कम पोखर्णी फाटा पाथरी, ता.पाथरी जि.परभणी येथे पंचा समक्ष स्विकारली आहे. त्यामुळे त्यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले असून पो.स्टे. पाथरी येथे गु.र.नं. ७०९/२०२५ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| सापळा पथक | श्री महेश पाटणकर, पोलीस उप अधीक्षक, सहा.पोउपनि/चंद्रशेखर निलपत्रेवार, पोह/१३६६ नामदेव आदमे, पोशि/१६८७ अतुल कदम, पोशि/१६३१ शेख जिब्राईल चापोशि/९२० अनिल नरवाडे सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी. |
| तपास अधिकारी | श्री अल्ताफ मुलाणी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या इसमाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.**


**संपर्क पत्ता :- कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, शनिवार बाजार, नानलपेठ, परभणी.**

**मा. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड :-** 9226484699.

**पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी :-** 9870313157, 9272211064.

दुरध्वनी क्रमांक :– 02452-220597 टोल फ्री क्रमांक:– 1064 ऑनलाईन ॲप acbmaharastra.net

| | |
|---|---|
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook : Acb Parbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |
| Instagram : acbparbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Youtube Channel @ACBParbhani | Find us on Google Map & Mappels india Map |

9272111064


पोलीस उप अधीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो परभणी

(महेश पाटणकर)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी